ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-VI April 2013

# शबाना

प्रा. डॉ. सुनील म. पवार,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
स. वा. जोशी विद्यासंकुल,
डोंबिवली (पूर्व) – 421201.

शबाना हा अनंतराव पाटील यांचा 'लोककथा' नंतरचा दुसरा कथासंग्रह आहे. छोट्या–मोठ्या अशा एकूण 13 कथा या कथासंग्रहात समाविष्ट झाल्या आहेत.

आधुनिक, परिवर्तनवादी व नैतिक दृष्टी असलेला हा लेखक 'शबाना' या कथासंग्रहात थोडे काल्पनिक व वास्तवातील अधिक अशा घटना प्रसंगावर व प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकांवर प्रकाश टाकत आहे. लेखकाने जे पाहिले, जे भोगले, अनुभवले व त्यापासून तो जे शिकला त्याचे प्रतिबिंब वाचकास पहावयास मिळावे, हा मर्यादित दृष्टिकोन डोळ्यापुढे ठेवून हा कथासंग्रह लिहिण्याचा प्रयत्न करतो आहे.

एकंदरीत या कथासंग्रहातील कथा ह्या निवेदनात्मक, घटनात्मक, प्रवासात्मक, चरित्रात्मक व स्त्रीजातीच्या कहाणीवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

'शबाना' ही पहिलीच कथा सत्यघटनेवर आधारीत आहे. या कथेत दोन विषय लेखक हाताळतो. ते म्हणजे 1. एक मुस्लीम स्त्री हिंदू देव–देवतांची पूजा करते. 2. उच्चवर्णीय माणसांना दलित माणसांची वर्दळ कशी बाटवून टाकते.

यांवर लेखक अतिशय मार्मिक विवेचन करतांना म्हणतो की, माणसां–माणसांत फरक तो कोणता? सारी माणसे देवाचीच लेकरे? मग हा भेदभाव कशासाठी? आजही कित्येक हिंदु कुटुंब पीर किंवा गरीब नवाजच्या दर्ग्यात जाऊन नवस करतात की! मग मुस्लीम धर्मीय स्त्रीने हिंदु देव–देवतांची पूजा केली तर वाईट काय? तसेच हरिजनांना गावकूसाबाहेर ठेवण्याचे कारण काय? जाती धर्माच्या भिंती फोडल्याशिवाय, मानवधर्माची कास धरल्याशिवाय समाजाची आण देशाची प्रगती होणार नाही. हा लेखकाचा दृष्टिकोन वाचकाला एकदम अंर्तमुख करतो.

'सूमा' ही अशीच सत्यघटनेवर आधारित कथा. यातील नायिका, नियतीच्या क्रूर खेळाशी धैर्यशीलपणे सामना करतांना दाखविली आहे. एकूणच तिचा आशावादी दृष्टिकोन जगण्यावर मात करुन जातो.

'साकी' या कथेत लेखक भारत भ्रमण करतांना भारतातील विविधतेतील एकतेत माणुसकीचा शोध घेण्यात यशस्वी झाला आहे. परदेशातील स्त्री आणि भारतातील स्त्री यांच्यात फारसा फरक नसतो. त्यांची सुखेच नव्हेतर, दुःखेही सारखीच असतात. हे लेखकाला अनुभवावरुन कळते.

'पारु' ही कथा ऊस तोडणीचे काम करणाऱ्या मोलकरीण स्त्रीची प्रातिनिधीक करुण कहाणी आहे. 'चुल आणि मूल' हेच वंजारी बाईचं जीणं! तिला कसलं स्वातंत्र्य नाही की स्वतःच विश्व नाही. फक्त भाकऱ्या बडविणारे व मुलांना जन्म देणारं यंत्र, बस्स! या यंत्राला मृत्युचा पूर्णविराम मिळेपर्यंत जगायचं. अशी ही कथा वाचकाच्या जाणिवेला सुन्न करुन टाकते. हेच या कथेचे यश आहे.

'गंगव्वा' ही कथा सुद्धा दुर्दैवाने आणि आत्मघातकी माणसामुळे वेश्या व्यवसायात फेकल्या गेलेल्या तरुण व करुण स्त्रीची कहाणी आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी सख्खे आईबाप आपल्या मुलीची विक्री करतात हे भीषण वास्तव या कथेत मांडण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

'नामयाची जनी' ह्या कथेतील नायिका दलित आहे. कथेत ती दलित समाजाचे प्रतिनिधीत्व करते. प्राध्यापकाच्या मुलाखतीत तिला वर–वर व उथळ स्वरुपाचे प्रश्न विचारुन कमिटी नापास करते. मात्र तिला योग्य मार्गदर्शन मिळाल्यावर ती प्राध्यापक पदासाठी लायक असल्याची खात्री परीक्षक मंडळाला पटते. ब्राह्मणवादी प्रवृत्तीची भीषणता येथे लेखक व्यक्त करतो. तर प्राध्यापक बाचलांसारख्या उच्चवर्णीय प्राध्यापकाबरोबर तिचा विवाह लावून परिवर्तनवादी विचारही मांडतो.

'रखुमाई' ही कथा लेखकाने आपल्या आईवर लिहिलेली आहे. तशी ती एका तपस्विनीची कथा आहे. ज्या तपस्विनीने जन्मभर आपला देह चंदनाप्रमाणे झिजवून इतरांच्या दुःखावर त्याचा लेप लावला, ही कथा एकूणच स्त्री–जीवनाच्या व्यथेवर, व्यक्तिस्वातंत्र्यावर तसेच कुटुंब व्यवस्थेवर मार्मिक भाष्य करते. पुरुषप्रधान संस्कृतीची बळी ठरलेली स्त्री आजही परावलंबीच आहे, याची जाणीव या कथेतून तीव्रतेने होते, अशीही प्रातिनिधीक कथा आहे.

तसेच दादा, करंजी व माऊली या कथेत लेखक हा कर्ता सुधारक असल्याचे मनोवेधक दर्शन वाचकास घडते. यशस्वी होण्यासाठी केवळ पदव्या, डिग्ऱ्या पाहिजे असे नाहीतर कष्ट, जिद्द, धडपड व निःस्वार्थी कामामुळे माणूस यशाचे उंच शिखर गाठू शकतो, असा विश्वास लेखक 'दादा' या कथेत व्यक्त करतो.

तर 'माऊली' या कथेत समाजाचा संसार केलेल्या एक त्यागी, भक्तीसंप्रदायी वारकऱ्याची दुर्मिळ कहाणी आली आहे. स्वतःला ज्ञानी म्हणून घेणाऱ्या पण कथा–प्रवचनासाठी हजारो रुपयांची बिदागी मागणाऱ्या, मोटारीची अट घालणाऱ्या, उंची हॉटेलात उतरणाऱ्या, आधुनिक महाराजांना 'माऊली' चांगलेच धारेवर धरतात.

'करंजी व ऋषी' या कथेतून लेखक कर्तृत्ववान व उदात्त व्यक्तिमत्व वाचकांसमोर ठेवतात. एकूणच लेखकाची समाजाकडे पहाण्याची दृष्टी सजग वाटते. कुठल्याही अनुभवाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. माणसांबद्दल त्यांना जिव्हाळा व ममत्व वाटते. लेखकाची दृष्टी जरी दैववादी असली तरी तिला माणुसकीचा उमाळा आहे. मध्ययुगीन संतांनी जसा लोककल्याण, विश्वकल्याणाचा विडा उचलला होता, तोच लेखकाने उचललेला दिसतो.

त्यामुळेच लेखक तळागाळातील, उपेक्षित, भटके गरीब, दारिद्र्यात जगणाऱ्या माणसांकडे 'समत्वाच्या' भावनेने पहातात. 'समतत्वाची भावना' जर समाजात रूजली गेली तर अखिल मानवजातीचा उत्कर्ष होऊन 'विश्वात्मक देवत्वाची' संकल्पना साकार झाल्याशिवाय रहाणार नाही, याची खात्री लेखक अनंतराव पाटलांना होती. त्यांच्यावर वारकरी संप्रदाय व संतपरंपरेचा मोठा पगडा (प्रभाव) असल्याने ज्ञानदेव, तुकारामांची वचने केवळ आठवणीत न ठेवता ती प्रत्यक्षात उतरली पाहिजेत. यासाठी ते त्यांची पेरणी, करंजी, गंगव्वा, माऊली, ऋषी या कथेत करतात.

अनंतरावांच्या भाषाशैलीला त्यामुळे एक अध्यात्मिक परिमाण प्राप्त झाले आहे. त्यांची भाषा दीन–दुबळ्यांविषयी कणव व्यक्त करणारी असून ती समाज प्रबोधनासाठी तळमळ व्यक्त करते. दंभावर व सनातनी व्यवस्थेवर ती घणाघाती प्रहार करते. त्यामुळे ती प्रखर व ओघवती वाटते. तिच्यातील शब्दकळा आकर्षक असून ती उत्तरोत्तर आशयसमृद्ध होत जाते.

यासर्व गोष्टींमुळे 'शबाना' हा कथासंग्रह वाचनीय झाला आहे, यात शंका नाही.

कथासंग्रहात काही ठिकाणी मुद्रणदोष झाल्याने अवधान सुटते, पण वाचतांना ते लक्षात येत नाही. पुस्तकाचे बर्हिरंगाचा विचार करता मुखपृष्ठ व मलपृष्ठ आकर्षक व सुबक आहे. बांधणी नीट–नेटकी असून हाताळायला पुस्तक सहज वाटते. एकूण पृष्ठसंख्या 75 पानांची असून किंमतही वाजवी रुपये 60.00 इतकी आहे. शेवटच्या पानावर लेखकाने आजपर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकाची व लेखांची सूची दिली आहे. त्यावरुन लेखकाचे अनुभव व लेखन प्रपंच कळतो.

असे सर्व असूनही अनंतरावांकडून अजून सकस लेखन व्हावे, हीच या शोधनिबंधाच्या निमित्ताने सदिच्छा!

धन्यवाद!